**MHNG080002272025**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१००/२०२५**
**नि.०९ खाली**

# न्यायनिर्णय

## (दिनांक ०६ मे, २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अन्वये खटला पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान तर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. आरोपीविरूध्द नि. क्रं.०९ खाली महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

३. आरोपीला त्याचे विरुध्द नोंदविण्यात आलेला संपरिक्षा अभिलेख मराठीतुन समजावुन सांगण्यात आला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाने घेतलेल्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नसल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.ए.पी.लुले आणि आरोपीतर्फे वकील श्री. ए.एम.नरवाडे यांचे युक्तीवाद ऐकले.

५. सदर खटल्यातील संपूर्ण पुरावा व कागदपत्रे पाहुन खालील प्रमाणे मुद्दे निर्धारीत केले व त्यास मी खालील नमुद कारणास्तव समोर दर्शविलेल्या निष्कर्षाप्रत पोहचलो :

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक २२.०१.२०२५ रोजी १३.०३ ते १५.५० वाजताच्या | |

| | | |
|---|---|---|
| | दरम्यान निलज खंडाळा, ता.पारशिवणी, जि.नागपूर येथे आरोपीने त्याच्या ताब्यात देशी दारुच्या १० निपा अवैधरीत्या बाळगल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही. |
| २ | काय आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फक्त एका साक्षीदाराला तपासले.

१. सुधाकर रामदास सोनवने (सा.क्र.१) पंच साक्षीदार

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :–**

७. सुधाकर (सा.क्र.१) हा पंच साक्षीदार आहे. त्याने त्याचे पुराव्यात असे सांगितले की, दिनांक २२.०१.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. पोलीसांनी त्याचे समक्ष कोणतही पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती व काहीही जप्त केले नव्हते. त्याने समन्सवर त्याची सही नि.क्र.१० असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे कथन केले. तसेच त्याने घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यावर त्याची सही निशाणी क्र.११ असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारले, परंतु साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य होईल असे कुठलेही कथन केले नाही.

८. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदार सुधाकर याने त्याचेसमक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही तसेच आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्त केले नाही असे कथन केले. तसेच दुस–या पंच साक्षिदाराने सुध्दा अभियोग पक्षाला सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्याची

साक्ष याकामी नोंदविलेली नाही. त्यामुळे घटनास्थळ/जप्ती पंचनामा हा पंच साक्षीदारामार्फत सिध्द झालेला नाही. जप्ती पंचनामा पंच साक्षीदारामार्फत सिध्द न होणे ही महत्वाची त्रुटी सदर प्रकरणात आहे.

९. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल नसल्यामुळे आरोपीचे ताब्यातुन जप्त केलेला पदार्थ हा दारुच आहे हे देखील अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवुन सिध्द केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक २ करिता खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. आरोपी चंद्रशेखर शेषराव कुथे याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या गुन्हयातुन दोषमुक्त करण्यात येत आहे.
२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.
३. जप्त मुद्देमाल महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ९८ प्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, नागपुर यांचेकडे पाठविण्यात याव्या.
४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी नव्याने रु.१५,०००/-चे वैयक्तीक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.05.06 13:43:10 +0530

दिनांक ०६.०५.२०२६

( रा.र.शेरेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२, कामठी.

## –: प्रमाणपत्र :–

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | सौ. परिणीता अ. निर्मल |
| न्यायालयाचे नांव | रा.र.शेरेकर<br>(प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र. २ कामठी) |
| टाईप केल्याचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०६.०५.२०२६ |